# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 92/2023 दिनांक : 28.02 .2023**

## नांदेड पोलीस दलातील सहा पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील सहा पोलीस अंमलदार यांचा नियत वयोमानानुसार दिनांक 28.02.2023 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली, **मा. श्रीमती डॉ अश्विनी जगताप**, पोलीस उप अधिक्षक(मु), नांदेड यांचे हस्ते आज दिनांक 28/02/2023 रोजी सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी **मा. श्री. अनिल चोरमुले**, पोनि नियंत्रण कक्ष नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, **श्रीमती कमल शिंदे**, मसपोनि पोलीस कल्याण नांदेड हजर होते. सदर सेवानिवृत्त समारंभ मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे पार पडला. सर्व सेवानिवृतांनी आता आपल्या कुटूंबाकडे लक्ष् द्यावे व सुखी समाधानाने आनंदी जिवन जगन्याचा सल्ला दिला. सदर सेवानिवृत्त समारंभास ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. **श्री अनिल चोरमुले**, पोनि नियंत्रण कक्ष नांदेड यांनी सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोउपनि **श्री विठ्ठल कत्ते** यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | सपोउपनि/5207 | अन्वर इकबाल शेख अमीर लतीफ | पोस्टे.इस्लापुर |
| 02 | सपोउपनि/5084 | अशोक बळीराम भिसे | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 03 | सपोउपनि/5074 | ओमदेव शिरू जुगनाके | पोस्टे किनवट |
| 04 | पोहेकॉ/733 | प्रकाश देविदास देशमुख | पोस्टे लिंबगाव |
| 05 | पोहेकॉ/1111 | लक्ष्मीकांत गंगाधर चारतवाड | पोस्टे मुखेड |
| 06 | पोहेकॉ/1374 | शेख शब्बीर हुसेन साब | पोस्टे मरखेल |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  93/2023          दिनांक : 28.02 .2023

## 1)जबरी चोरी :–

**किनवट** :–दिनांक 27.02.2023 रोजी 11.40 वा. चे सुमारास, **बि अॅण्ड सी कॉर्टरच्या बाजुच्या कचा रस्ता गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** फिर्यादी हा त्याचे अधिकारी शिवा पाटील असे शिवशक्ती नगर, पोर्णिमानगर, आंबेडकरनगर गोकुंदा येथे भारत फायनान्स इन्क्लुज लि. कंपणीची मीटींग घोऊन त्यात जमा झालेले काळया रंगाचे बॅगमधील नगदी 3,38,106/–रूपये एक सॅमसंग कंपणीचा  मोबाईल किंमती 12,000/–रूपये तसेच बॉयेमॅट्री मशीन पी.बी. कंपणीची किंमती 2500/–रूपयाची असा एकुण 3,52,606/–रूपयाचा माल घेवुन त्यांची मो सा क्रं एमएच–26/बीव्ही–2178 वर जात असतांना तेवढयात पल्सर कंपणीची काळया रंगाची  मो सा नंबर नसलेली ज्यावर दोन अज्ञात इसम बसुन तोंडाला रूमाल बांधलेले त्यांनी फिर्यादीची मोटार सायकल आडवुन फिर्यादीचे व साक्षीदाराचे डोळयात मिरची पुड टाकुन 3,52,606/–रूपयाचा ऐवज जबरीने हिसकावुन चोरून घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी प्रणव पि. प्रकाश जाधव, वय 19 वर्षे, व्यवसाय नौकरी भारत फायनान्स इल्क्ल्युज लिमीटेड रा. मेंडकी ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 53/2023 कलम 392, 341, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार, मो.क्रं. 9850061133** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)देगलुर** :– दिनांक 27.02.2023 रोजी चे 11.00 ते 16.00 वा.  चे दरम्यान, **अष्टविनायक अपार्टमेंट बी–3 उदगीर रोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फियादी हा शाळेत गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने माझ्या अष्टविनायक अपार्टमेंट बी–3 उदगीर रोड देगलुर येथील घराचे कडीकोंडा तोडुन घरात प्रवेश करून घरातील बेडरूम मधील लोखंडी कपाट उघडुन, कपाटाचे लॉकर तोडुन आतील 22 तोळे वजनाचे सोन्याचे दागीने किंमती 6,60,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालीका दिपक सोनटक्के, वय 40 वर्षे, व्यवसाय सहशिक्षीका मुळ रा. सत्कार कॉलणी वसमत रोड परभणी ह. मु. आष्टविनायक अपार्टमेंट बी–3 उदगीर रोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 106/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास  पोनि/श्री माचरे, मो.क्रं. 9821159844**  हे करीत आहेत.

**2)देगलुर** :– दिनांक 27.02.2023 रोजी चे 01.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **मौ. दरेगाव येथील हनुमान मंदीर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने मौ. दरेगाव येथील हनुमान मंदीराचे चॅनलगेटचे कुलूप उघडुन आत प्रवेश करून आतील दानपेटीचे कुलूप उघडुन दान पेठीत ठेवलेली रक्कम व चांदीचे दागीने असा एकुण 3,85,800/–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत गंगाधरराव गज्जलवार, वय 49 वर्षे, व्यवसाय शेती (सरपंच प्रतिनिधी) रा. दरेगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 104/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास  सपोनि/श्री माळाळे, मो.क्रं. 9821159844**  हे करीत आहेत.

**3)मरखेल** :– दिनांक 25.02.2023 रोजी चे 07.00 ते दि. 26.02.2023 चे 22.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. येडुर खु. ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याची पत्नी असे त्यांची मेव्हणी मयत झाल्याने अंत्यविधी साठी इस्लापुर येथे गेले असता यातील कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी घरात प्रवेश करून कपाटाचे दार तोडुन नगदी 85,000/–रूपये व दोन पाच ग्रॅमच्या सोन्याच्या अंगठया किंमती 30,000/–रूपयाच्या असा एकुण  1,15,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी श्रीरंग पि. पुंडलीकराव बिरादार, वय 46 वर्षे, व्यवसाय शेती रा. येडुर (खु.) ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 32/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मद्दे, मो.क्रं. 9049918000**  हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)कंधार** :– दिनांक 24.02.2023 रोजी चे 18.30 ते दि. 27.02.2023 चे 09.30 वा. चे दरम्यान, **पंचायत समीती कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने कृषी विभाग कार्यालयाचे दर्शनी भागात ठेवलेले एक इन्वरर्टर व दोन बॅटरी 66,059/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी श्री बळीराम गंगाराम कांबळे, वय 56 वर्षे, व्यवसाय नौकरी पंचायत समिती कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 47/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य,  मो.क्र. 9823391570** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :—

**1)विमानतळ :—** दिनांक 25.02.2023 रोजी चे 20.00 ते दि. 26.02.2023 रोजी चे 07.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोरील पोर्चमध्ये लावलेली आंबानगर सांगवी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो हांडा कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–38/ए–5633 किंमती 25,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गौतम नागोराव नरवाडे, वय 47 वर्षे, व्यवसाय आर्मी रिटायर रा. आंबानगर सांगवी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 68/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1334 जाधव, मो. क्रं. 9923078806** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**1)कंधार :—** दिनांक 24.02.2023 रोजी 07.30 वा. चे सुमारास, **जांब बु. ते दिग्रस बु. जाणारे रोडवर संत्राम पाटील यांचे शेताजवळ ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुलेमान कालेसा शेख, वय 06 वर्षे, रा. सेमठाणा ता. नायगांव** हा व त्याचे आई वडील सोबत रोडचे कडेने शेताकडे जात असतांना संत्राम पाटील यांचे शेताजवळ अज्ञात क्रुजर चालकांने त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयत मुलास धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी कालेसाब पि. नबीसाब शेख, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती मजुर रा. सोमठाणा ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 48/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुखेडकर, मो.क्रं. 8308840863** हे करीत आहेत.

**2)सोनखेड :—** दिनांक 25.02.2023 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **उस्माननगर ते नांदेड जाणारे रोडवर विठ्ठल पेट्रोलीयम पंप किवळा समोर रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर व्यंकटराव पांचाळ, वय 52 वर्षे, रा. राहाटी बु. ता. जि. नांदेड** हा तेरवीच्या कार्यक्रमासाठी जावुन दुपारी तीन वाजताचे सुमारास उस्माननगर ते नांदेड जाणारे रोडने मो सा क्रं एमएच–22/जे–8467 वर नांदेड मार्गे गावी येत असतांना विठ्ठल पेट्रोलीयम किवळा समोरील रोडवर कार क्रमांक एमएच–12/ईजी–2192 च्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार ही हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयताचे मो सा ला पाठीमागुन जबर धडक देवुन गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी विनोद शंकरराव पांचाळ, वय 25 वर्षे, व्यवसाय वेल्डींग काम रा. राहाटी बु. ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 26/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री विशाल भोसले, मो.क्रं. 9960157059** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)लोहा :—** दिनांक 27.02.2023 रोजी चे 17.10 वा. चे सुमारास, **सोनी सांडी सेंटरच्या पाठीमागे बोळीत लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1230/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2483, प्रकाश यादव साखरे, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 41/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/408 केंद्रे, मो.क्रं. 9823703017** हे करीत आहेत.

**2)मरखेल :—** दिनांक 27.02.2023 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **मन्मथ स्वामी मंदीराचे समोर रोडवर मौ. हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशीररीत्या कल्याण क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1250/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3206, चंद्रकांत बाबुराव पांढरे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 33/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

## 7)गळफास घेवुन मृत्यु :—

**नायगांव :—**दिनांक 25.02.2023 रोजी 05.00 ते 06.30 वा. चे दरम्यान, **गडगा येथे पंक्चर दुकानात टिन पत्राचे अँगलचे पंख्याला ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर मोहनराव भाकरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. गडगा ता. नायगाव जि. नांदेड,** यांनी पिक कर्ज घेतले होते. त्योचे थकीत कर्ज 8,66,947 रूपये झाले होते. एवडे कर्ज कशाने फेडावे या तणावातुन कर्जाला कंटाळुन पंक्चरच्या दुकानातील लोखंडी अँगलला चिंदकाचे दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार विश्वनाथ मोहनराव भाकरे, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती व ॲटो चालक रा. गडगा ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगांव** आ. मृ. **03**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री वाघमारे, मो.नं. 9096618241** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड